Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849727

# रोजगार, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्र

**प्रा.एस. ए. वडघणे**[1]

**प्रस्तावना**

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. त्याचबरोबर भारतामधील तरुण लोकसंख्येचे प्रमाण लक्ष्मी आहे. या नवतरुणांना रोजगाराच्या योग्य संधी मिळाल्या तर, भारतीय अर्थव्यवस्थेत रोजगार हा आर्थिक विकासाचा मुख्य घटक होईल. परंतु वाढती लोकसंख्या, तांत्रिक बदल आणि असमतोल विकासामुळे बेरोजगारीची समस्या गंभीर बनली आहे. भारतातील मोठा कामगार वर्ग असंघटित क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्यात सामाजिक, आर्थिक, रोजगार विषयक सुरक्षा व स्थैर्याचा अभाव आहे. त्यामुळे या पेपरमध्ये रोजगाराची स्थिती, बेरोजगारीचे प्रकार, असंघटित क्षेत्राचे स्वरूप व त्यासंबंधी समस्या आणि उपाययोजना यांचे विश्लेषण केले आहे.

व्यक्तीच्या उत्पन्नाचा स्रोत म्हणजे रोजगार. परंतु भारतासारख्या विकसनशील देशात बेरोजगारी व अपूर्ण रोजगार ही गंभीर समस्या आहे. विशेषतः असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे रोजगार, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्र यांचा परस्पर संबंध अभ्यासणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे**

१) भारतातील रोजगार क्षेत्राचा अभ्यास करणे.
२) भारतातील बेरोजगारीच्या समस्या जाणून घेणे.
३) भारतातील असंघटित क्षेत्र व संघटित क्षेत्र यामधील तुलनात्मक अभ्यास करणे.
४) रोजगार बेरोजगारी व असंघटित क्षेत्र याविषयी असलेल्या संधीचा अभ्यास करणे.

**व्याख्या:**

१) **रोजगारी** : उत्पन्न मिळविण्यासाठी प्रयत्नपूर्वक केलेले उत्पादनक्षम कार्य म्हणजे रोजगार होय.

**रोजगाराचे प्रकार**

[1] अर्थशास्त्र विभाग, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई

अ) संघटित क्षेत्रातील रोजगार:- सरकारी क्षेत्र, मोठ्या खाजगी कंपन्या

आ) असंघटित क्षेत्रातील रोजगार :- लघुउद्योग, बांधकाम, घरकाम

इ) स्वयंरोजगार:- किरकोळ व्यवसाय, शेती

ई) अर्धरोजगार:- हंगामी रोजगार

**व्याख्या:**

2) **बेरोजगारी:-** काम करण्याची क्षमता व इच्छा असूनही काम न मिळणे म्हणजे बेरोजगारी होय.

**बेरोजगारीचे प्रकार :-** खुली बेरोजगारी, अदृश्य बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, सुशिक्षित बेरोजगारी, रचनात्मक बेरोजगारी

**भारतातील बेरोजगारीची कारणे:** लोकसंख्या वाढ हे एक बेरोजगारीचे महत्त्वाचे कारण आहे. औद्योगिक विकासाचा अभाव असल्या कारणामुळे जो व्यवसाय सुरू केला त्यामध्ये यश मिळेलच याची शाश्वती मिळत नाही. कौशल्य प्रशिक्षणाची कमतरता असल्यामुळे दर्जेदार उत्पादन मिळत नाही आणि त्यामधून मिळणारा मोबदला देखील कमी असतो, शेतीवर जास्त अवलंबित्व असल्या कारणामुळे हंगामी बेरोजगारीचे व छुप्या बेरोजगारीचे प्रमाण त्यामध्ये वाढलेले आहे. तंत्रज्ञानामुळे रोजगार कमी झाले आहेत त्यामुळे नव तरुणांना बेरोजगारीच्या समस्येला सामोरे जावे लागते किंवा रोजगारीसाठी खूप प्रयत्न करावे लागतात त्यामध्ये त्यांचा खूप वेळ वाया जातो. भौगोलिक असमतोल हे एक महत्त्वाचे कारण म्हणता येईल कारण काही ठिकाणी नैसर्गिकरित्या फार मोठ्या प्रमाणावर ती रोजगाराची साधने उपलब्ध आहेत तर काही भौगोलिक ठिकाणी रोजगाराची साधने फार कमी प्रमाणावर आपल्याला दिसून येतात. यासारखी कारणे आहेत.

**व्याख्या:**

**3) असंघटित क्षेत्र:-** ज्या क्षेत्रात कामगारांना निश्चित वेतन, सामाजिक सुरक्षा, सेवा अटी व कायदेशीर संरक्षण मिळत नाही, त्या क्षेत्राला ‘असंघटित क्षेत्र’ असे म्हणतात.

**असंगतीत क्षेत्राची वैशिष्ट्ये:-** कामासंबंधी कोणताही लिखित करार नसतो त्यामुळे अनेकदा कामगारांची फसवणूक झाल्याची आपल्याला दिसून येते, कामगारांना किमान वेतनाची हमी नसते त्यामुळे दिलेल्या वेतनावरती समाधान मानावे लागते किंवा कमी वेतनावर काम करावे लागते, सामाजिक सुरक्षा नसल्याकारणाने प्रत्येक कामामध्ये कमी जास्त उच्चनीच असा भेदभाव आपल्याला दिसून येतो त्यामधून देखील अनेक

समस्या उभ्या राहतात, अनियमित रोजगार, कामाचे अनिश्चित तास उदा. शेतीमजूर, बांधकाम कामगार, घरकाम करणाऱ्या महिला, फेरीवाले, लघुउद्योगातील कामगार व त्यांच्यामध्ये कोणतीही संघटना, बांधिलकी नसणे.

**रोजगार, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील समस्या** :- १) केलेल्या कामाचा कमी वेतन मिळते त्यामुळे बचतीचे प्रमाण देखील कमी असते,2) आरोग्यविषयक, सामाजिक समस्या काय झालं मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे काम करण्याची क्षमता कमी व त्यातून दारिद्र्याकडे वाटचाल होते 3) कौशल्य आधारित रोजगाराचे प्रमाण कमी असल्यामुळे रोजगाराची अस्थिरता निर्माण होते. ४) बालमजुरी हे एक फार मोठी समस्या आहे कारण कमी वयामध्ये काम केल्यामुळे आवश्यक शिक्षण किंवा प्रशिक्षण घेतले जात नाही त्याचा परिणाम पुढील आयुष्यावर होतो. ५) महिला कामगारांचे शोषण होत असल्याचे आपल्याला वेगवेगळ्या अहवालातून दिसून येते त्यामुळे महिलांची काम करण्याची मानसिकता कमी असते. यासारख्या समस्या असल्याचे दिसून येते.

**रोजगारी व असंघटित क्षेत्रासमोरील आव्हाने:-** असंघटित क्षेत्राचे अचूक डेटा अभाव असल्यामुळे शासनाला देखील कोणत्याही विकासाच्या योजना राबवत असताना अचूक अंदाज घेऊन योजना तयार करता येत नाहीत किंवा त्या राबवता येत नाहीत. योजनांची अपुरी अंमलबजावणी होते त्यामागे वेगवेगळी कारणे असू शकतात अचूक डेटा नसणे किंवा असलेल्या डेटा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसणे. आपल्या हक्क व अधिकाराबाबतीत जागरूकता नसणे त्यामुळे आपल्या विकास करून घेण्यासाठी आवश्यक ती तयारी होत नाही आणि त्यामधून आवश्यक आर्थिक प्राप्ती मिळत नाही, आर्थिक असमानता याबरोबरच इतरही काही समस्या भेडसावताना दिसून येतात.

**रोजगार, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्र सुधारण्यासाठी आवश्यक उपाय:-**

१) सामाजिक सुरक्षा कवच मजबूत करणे.
२) किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करणे.
३) कौशल्य प्रशिक्षण व उद्योजकता विकास योजनांचा प्रचार प्रसार करणे.
४) लघु व सूक्ष्म उद्योगांना प्रोत्साहन देणे.
५) डिजिटल नोंदणी प्रणाली मजबूत करणे.

कौशल्य आधारित शिक्षण आणि त्यावर आधारित रोजगार निर्मिती यांचा जर वेळ बसला तर रोजगारीमध्ये वाढ होऊन बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल. तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांना आपल्या अधिकारांची व

कर्तव्याची जाणीव झाली तर त्यांच्यामध्ये संघटित रूप येऊन ते आपल्या आर्थिक सामाजिक राजकीय जीवनाविषयी प्रगती करतील आणि त्यातून असंघटित क्षेत्राचा विकास होईल.

**निष्कर्ष**

भारतीय अर्थव्यवस्थेत असंघटित क्षेत्राचा वाटा मोठा आहे. रोजगार निर्मितीबरोबरच कामगारांचे संरक्षण आवश्यक आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि औद्योगिकीकरण यावर भर देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात त्यासाठी ग्रामीण भागाचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजेच संघटित आणि असंघटित क्षेत्र यांच्यातील दरी कमी केल्यास देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

**संदर्भग्रंथ**

१) भारतीय अर्थव्यवस्था लेखक किरण देसले. पृष्ठ क्रमांक -१३६
२) कामगार नामा वार्षिकी -२०२५
३) भारतीय अर्थसंकल्प- २०२५-२६
४) महाराष्ट्र अर्थसंकल्प:- २०२५-२६
५) भारत सरकार आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*